९५३/

महाराष्ट्र शासन

# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु.एक्सेलसिअर
बिल्डींग, ए.के.नायमक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
संकेतस्थळ : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

क्रमांक : बैठक-१८२२/प्र.क्र. २०९/प्रनिप्रा/१४फेब्रु../इतिवृत्त/२५७ दिनांक : 15 FEB 2023

## बैठकीचे इतिवृत्त

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक ३१/०१/२०२३ रोजीची क्रमांक ६९वी बैठक **मंगळवार, दिनांक १४ फेब्रुवारी, २०२३ रोजी सकाळी ११:०० वा.** पुढे चालु ठेवण्यात आली असून, सदरील बैठकीचे इतिवृत्त,-

प्राधिकरणाचे सदस्य डॉ. रविंद्र शिवाजी बंगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (दूरदृष्य प्रणालीद्वारे) व श्री. महेन्द्र ब. वारभुवन (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य हे बैठकीस उपस्थित होते.

तसेच प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, २) प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर, माजी कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक तथा संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, ३) डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा. यांनी बैठकीच्या अनुपस्थितीबाबत नियमाप्रमाणे रजेचा अर्ज दिलेला नाही. सबब त्यांना नियमाप्रमाणे अनुपस्थित घोषित करण्यात आले, तसेच ४) डॉ. वि.एम. मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांनी ईमेलद्वारे कळविल्यानुसार त्यांची अनुपस्थितीबाबत नोंद घेण्यात आली.

१) ॲड. समीर पी. खेडकर, वकिल, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई व २) वैद्य. जे.जे. पवार, प्रतिनिधी, आयुष संचालनालय, मुंबई हे विशेष निमंत्रित बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

**विषय क्रमांक १: शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रथम वर्ष व्यावसायिक होमिओपॅथीक अभ्यासक्रमास प्रवेशित कु. समृद्धी थोरात यांच्या प्रवेश प्रकरणी आयुष शिक्षण संचालनालय, मुंबई यांचा दिनांक ७/०२/२०२३ रोजीचा अहवालास अनुसरुन निर्णय घेण्याबाबत.**

प्रस्तूत प्रकरणी प्राधिकरण कार्यालयाद्वारे कळविल्यानुसार कु. समृध्दी थोरात- संबंधित विद्यार्थीनी व महाविद्यालयाचे प्रतिनिधी श्री. सुनिल टी. मगदुम, मुख्य लिपिक, हौसाबाई होमिओपॅथिक महाविद्यालय, कोल्हापुर तसेच ॲड. समीर पी. खेडेकर, वकिल, उच्च न्यायालय, मुंबई हे सुनावणीस उपस्थितीस होते.

मा. उच्च न्यायालयाच्या याचिका क्रमांक ६५६५/२०२२ मधील दिनांक २३/०२/२०२२ रोजीच्या न्यायालयीन आदेशानुसार उपस्थित विद्यार्थीनी व महाविद्यालय प्रतिनिधी यांनी त्यांचे म्हणणे प्राधिकरणासमोर मांडले, तसेच ॲड खेडकर यांनी या संदर्भातील न्यायालयीन बाजू प्राधिकरणास अवगत केली.

हौसाबाई होमिओपॅथिक महाविद्यालय, कोल्हापुर येथील शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी होमिओपॅथीक अभ्यासक्रमास प्रवेशित कु. समृध्दी थोरात यांच्या प्रवेश प्रकरणी आयुष संचालनालय, मुंबई यांनी सादर केलेला दिनांक ७/०२/२०२३ रोजीच्या अहवालामध्ये उक्त विद्यार्थीनी प्रवेशास 'अपात्र' असल्याचे अवगत केले आहे. सदर अहवाल व संबंधित न्यायालयीन आदेशाचे अवलोकन करुन विचार-विनिमय करण्यात आला.

सदरील प्रकरणी साधक-बाधक चर्चा करुन आयुष संचालनालय, मुंबई यांनी सादर केलेला दिनांक ७/०२/२०२३ रोजीच्या अहवालानुसार शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी होमिओपॅथीक अभ्यासक्रमास प्रवेशित कु. समृध्दी थोरात यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता नाकारण्यात येत आहे. याबाबत सर्व संबंधितांना कळविण्यात यावे.

**विषय क्रमांक २: मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.**

(क) शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने राबविण्याकामी सेवापुरवठादार निश्चित करण्याबाबत ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. त्यानुसार एकुण ०४ पैंकी ०२ सेवापुरवठादार पात्र ठरले. तथापि, कमी दर सादर केलेल्या मे. एडूस्पार्क इंटरनॅशनल प्रा.लि. या सेवा-पुरवठादाराला वाटाघाटीसाठी उद्योग ऊर्जा कामगार विभाग येथील शासन निर्णय क्रमांक भाखंस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दिनांक १/१२/२०१६ मधील ४.४.३.१ (ब) प्रमाणे वाजवी जर प्राप्त करण्यासाठी सर्वात कमी दर सादर करणाऱ्या मे. एडूस्पार्क इंटरनॅशनल प्रा.लि. यांना वाटाघाटीसाठी दिनांक १०/०२/२०२३ रोजी पाचारण करण्यात आले. मात्र त्यांच्याकडून दर अद्याप अंतिमत: लेखी स्वरुपात प्राप्त झालेले नसून, ही बाब शासनास मार्गदर्शन तथा अवलोकनार्थ अवगत करण्यात आली असल्याचे आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, सीईटी कक्ष यांनी प्राधिकरणास अवगत केले.

तसेच राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या सामाईक प्रवेश परीक्षांच्या संभाव्य तारखा अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत, त्यानुसार परीक्षा घेण्याचे नियोजित करण्यात येत आहे.

सबब मे. एडूस्पार्क इंटरनॅशनल प्रा.लि. यांच्याकडून लिखित स्वरुपात दर प्राप्त झाल्यानंतर RFP नुसार दर निश्चित करणेबाबत किंवा योग्य तो निर्णय घेण्याबाबत प्राधिकरणाच्या निर्णयाकरिता सादर करण्यात येईल, असे आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी प्राधिकरणास स्पष्ट केले.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने राबविण्याकामी सेवापुरवठादार निश्चित करण्याबाबत ई-निविदा संदर्भात राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षा

मार्फत तयार करण्यात RFP प्रकरणी आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष तथा सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी उपरोक्त प्रमाणे सद्यस्थितीबाबत सादर केलेल्या वस्तूसिथतीची प्राधिकरणाने नोंद घेतली.

तसेच आज रोजी घेण्यात आलेली प्राधिकरणाची क्रमांक ६९वी बैठक मंगळवार, दिनांक २८/०२/२०२३ रोजी ठिक सकाळी ११:०० वा. पुन्हा पुढे सुरु करण्यात येईल.

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, बैठकीच्या सरतेशेवटी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

15/2/23

**(जे.पी. डांगे)** भा.प्र.से.
**अध्यक्ष,**
**प्रवेश नियामक प्राधिकरण तथा**
**माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.**

दिनांक : 15 FEB 2023